**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

रामाआ - तक्रार क्र. अम- ७९/२०१९

तक्रारकर्ता श्री.रविंद्र भवरीलाल छल्लाणी.
रा.शिवनेरी चौक आर्णी, ता.आर्णी, जि.यवतमाळ.
विरुध्द

जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, आर्णी,
ता.आर्णी, जि.यवतमाळ.
प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद कार्यालय, आर्णी, ता.आर्णी, जि.यवतमाळ.
तक्रार सुनावणी दिनांक - २५.०७.२०२४.

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

तक्रारकर्ता यांनी दि.०७.१२.२०१९ रोजी आयोगाचे स्तरावर कलम १८ (१)(ग) अन्वये तक्रार दाखल करुन, नगर परिषद, आर्णी यांचे कडून माहिती अधिकार अर्जातील माहिती देण्यास दिरंगाई करित असल्याबाबत, असे कारण नमुद केले आहे.

प्रस्तुत तक्रारीवर आज दि.२५.०७.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच उत्तरवादी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.०८.२०१९ रोजी रितसर माहितीचा अर्ज दाखल करुन, अशोक भवरीलाल छल्लाणी रा.आर्णी यांनी निवडणूक कामाकरिता आम आदमी पक्ष यांना करुन दिलेल्या जागेच्या भाडे करारनाम्याबाबतची छायांकित प्रत व निवडणूक संबंधाने केलेले पत्र व्यवहाराच्या छायाकित प्रतीबाबत माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांचेकडून ३० दिवसाच्या विहीत मुदतीत माहितीचे प्रदान न झाल्याने तक्रारकर्त्याने आयोगाकडे थेट तक्रार दाखल केल्याचे दिसून येते.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे, तक्रारकर्ता यांचा युक्तीवाद व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या खुलाश्यावरुन असे निदर्शनास येते की, तक्रारदार श्री.छल्लाणी यांनी दि.१९.०८.२०१९ रोजी

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय
सत्यमेव जयते
अमरावती विभाग, अमरावती

दाखल केलेल्या जोडपत्र-अ वर कुठालाही प्रतिसाद न मिळाल्यामुळे कलम १८ (१) नूसार तक्रार अर्ज दाखल केलेला आहे. त्यावर आयोगाचेवतीने सदर तक्रार अर्जाची प्रत विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, आर्णी यांना अग्रेषित करण्यात आली. त्यानुषंगाने खुलासा सादर करण्याचे देखील निर्देश देण्यात आलेले आहेत. मात्र त्यावर अद्यापही कुठलाही खुलासा सादर केलेला नाही. तसेच तक्रारकर्ता यांनी याबाबतीत प्रथम अपील अर्ज केला किंवा कसे अशी दि.१८.०८.२०२३ रोजी आयोगाचे वतीने विचारणा करण्यात आली त्या पत्रालाही प्रतिसाद दिला नाही. मात्र आज झालेल्या सुनावणीत तक्रारकर्ता यांनी वारंवार माहिती अर्ज दाखल केल्यानंतरही त्यांना प्रतिसाद न मिळाल्यामुळे आयोगाकडे थेट तक्रार अर्ज दाखल केलेला आढळून येतो. ही बाब लक्षात घेता, **मा.उच्च न्यायालय यांनी त्यांचे निबंधक उच्च न्यायालय विरुध्द राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर व इतर** या प्रकरणात पारित केलेल्या आदेशाचे अनुषंगाने विद्यमान मुख्याधिकारी तथा प्रथम अपिलीय अधिकारी, नगर परिषद, आर्णी यांनी प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेणे हे अधीक उचीत असून, प्रथम अपिलीय अधिकारी हे संबंधित प्राधिकरणातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्यावर सुनावणीच्या वेळी ते तोडगा काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भुमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये प्रथम अपिलीय अधिकारी घोषित करण्यात आले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल करण्यात आलेल्या प्रथम अपील अर्जावर संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून निर्णय पारीत करणे आवश्यक आहे. तद्नंतर या प्रथम अपीलाच्या निर्णयावर कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल करणे अभिप्रेत आहे.

अत: प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांच्या प्रथम अपिलवर प्रथमत: सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आवश्यक आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(८)(a) व १९(७) अन्वये आयोगास प्राप्त अधिकारान्वये **प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, आर्णी** यांना आदेशीत करण्यात येते की, तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिल अर्जावर सदर आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सुनावणी घेवून समन्यायीक निर्णय पारित करण्यात यावा. याकरीता तक्रारकर्त्यास लेखी सुचना देवून सुनावणी आयोजित करावी. सुनावणीची लेखी सुचना संबंधितांना बजावून दोन्ही पक्षाची बाजू ऐकुन स्वयंस्पष्ट आदेश पारीत करावेत.

प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी जर प्रथम अपिल आदेशाद्वारे माहिती देण्याचा निर्णय घेतला तर त्या निर्णयानुसार तक्रारकर्त्यास माहिती विहित करण्यात आलेल्या वेळेत प्राप्त होईल याची प्रथम अपिलीय अधिकारी यांनी खात्री करावी.

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय
सत्यमेव जयते
अमरावती विभाग, अमरावती

तक्रारकर्ता यांना प्रथम अपिलावरील निर्णय मान्य न झाल्यास/ अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोग अमरावती कार्यालयाकडे व्दितीय अपिल करण्याची मुभा राहिल. व्दितीय अपिल दाखल करतांना सदर आदेशाचा संदर्भ नमुद करणे आवश्यक राहिल.

तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, आर्णी यांना आदेशीत करण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालयामधील मुळ याचिका (सिव्हील) क्र. ९९०/2021, दिनांक १७, ऑगस्ट २०२३ चे आदेश तसेच सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. रामाआ २०१९/प्र.क्र.१८/सहा, दिनांक १६.०२.२०२३ अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ च्या अंमलबजावणीत सूचित करण्यात आले आहे त्यानुसार प्रत्येक शासकीय व निमशासकीय कार्यालयातील स्वयंम प्रेरणेने घोषित करावयाची माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ अनुसार १७ मुदयांची माहिती वेळोवेळी (दरवर्षी १ जानेवारी व १ जुलै) अद्ययावत करण्यात यावी तसेच कलम ४ व्यतीरीक्त आपल्या कार्यालयातील स्वयंप्रेरणेने प्रदर्शीत करणे आवश्यक असलेली सर्व माहिती आपल्या अधिकृत संगणक संकेतस्थळावर वेळोवेळी प्रदर्शित करण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य माहिती आयोगास सादर करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.

आदेश

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय
सत्यमेव जयते
अमरावती विभाग, अमरावती

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २५.०७.२०२४**

जावक क्रमांक ६६०७ दिनांक 08 OCT 2024

निर्गमित केले
08 ?